**मटा अँकर** **'एनएमआरडीए'ची रस्ता रुंदीकरणाबाबत नवी नियमावली**

# महापालिका हद्दीबाहेर १५ ते ३० मीटरचे रस्ते

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक**

नाशिक महानगर विकास प्राधिकरणाने (एनएमआरडीए) आपल्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांबाबत नवीन नियमावली तयार केली आहे. भविष्यातील नाशिकचा विकास पाहता रस्ते रुंदीकरणाबाबतच्या नियमावलीत बदल करीत 'एनएमआरडीए'च्या कार्यक्षेत्रात यापुढे कमीत कमी १५ मीटरपासून ते ३० मीटरपर्यंतचे रस्ते मंजूर केले जाणार आहेत. त्यामुळे भविष्यातील वाहतूक कोंडी टाळता येईल.

नाशिक शहराचे नागरीकरण झपाट्याने होत आहे. त्यामुळे शहरातील जागांची कमतरता पाहता राज्य सरकारने नाशिकचा विस्तार करण्यासाठीस सन २०१६ मध्ये 'एनएमआरडीए'ची स्थापना केली. यामाध्यमातून सिन्नर, पिंपळगाव, निफाड, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी परिसराचा विकास केला जाणार आहे. प्राधिकरणासाठी मूलभूत सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून सुमारे १६ हजार हेक्टर जागादेखील 'एनएमआरडीए'कडे वर्ग केली आहे. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने या क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. सिंहस्थात येणाऱ्या भाविकांची गर्दी पाहता रस्त्यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाच्या मदतीने शिर्डी व ओझरला जोडणारे, तसेच नाशिकच्या विकासाला हातभार लावतील अशा पद्धतीने मोठ्या रस्त्यांचे नियोजन केले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रिंगरोडबाबतचे निर्णय घेतले असून, शहराला जोडणारे आठ प्रमुख रस्ते अधिक रुंद केले जाणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर एनएमआरडीएने देखील आपल्या क्षेत्रातील रस्ते रुंदीकरणासाठी नियमावलीत बदल केला आहे. यापुढे १८ मीटरपासून तर ३० मीटरपर्यंत कमीत कमी रस्ते करण्यासाठी नवीन नियमावली तयार केली आहे. जेणेकरून भविष्यात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होणार नाही. आयुक्त माणिक गुरसाळ यांनी रस्त्यांची रुंदी वाढवण्यासंदर्भात आदेश दिले.

### असे आहेत आदेश...

| मार्ग | सध्याची रुंदी | नवीन रुंदी |
|---|---|---|
| ग्रामीण मार्ग | १५ मीटर | १८ मीटर |
| इतर जिल्हा मार्ग | १८ मीटर | २४ मीटर |
| प्रमुख जिल्हा मार्ग | २४ मीटर | ३० मीटर |



> नाशिक शहरातील वाहतूक कोंडी लक्षात घेता, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाचा विकास करताना मोठे व रुंद रस्ते करण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी नियमावलीत सुधारणा केली आहे.
>
> **- डॉ. माणिक गुरसाळ**, आयुक्त, नाशिक महानगर विकास प्राधिकरण

### परवानगी देताना रुंदीकरणाची अट

रस्ते रुंदीकरणासाठी विकसित भागात परवानगी देताना यासंदर्भातील अट टाकली जाणार आहे. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे रुंदीकरण करताना नवी नियमावली लागू होणार आहे. ज्या जागेतून रस्ता जाणार आहे, त्या विकसकाला नव्या नियमानुसार रस्ता रुंदीकरणासाठी जागा सोडणे बंधनकारक राहील. त्यामुळे भविष्यातील वाहतूक कोंडीतून नाशिककरांची सुटका होणार आहे.